Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Nagpur

**Post Graduate Teaching Department of Economics**

**&**

**Centre for Regional Development Studies**

*Organises*

**TWO DAY MULTIDISCIPLINARY**

# INTERNATIONAL CONFERENCE

ON

# "SUSTAINABLE & INCLUSIVE GLOBALISATION"

**16th and 17th January 2020**

## Certificate

This is to certify that Dr./Mr./Ms. Prashant D Harumkure of YDVD Arts & Commerce College, Tiusa, Amravati. has participated in the **Two Day Multidisciplinary International Conference** on **"Sustainable & Inclusive Globalisation"** organised by Post Graduate Teaching Department of Economics in association with Centre for Regional Development Studies on 16th and 17th January, 2020. S/he has presented a paper entitled Inclusive globalisation - Poverty reduction & Inequality. in this conference.

**Dr. (Mrs.) Aparna Samudra**
Organising Secretary

**Prof. (Mrs.) Sneha Deshpande**
Conference Director

डॉ. दि. व्यं. जहागिर्दार

## गौरव ग्रंथ



# रोजगाराचा वादप्रश्न : विचार आणि वास्तव



संपादक

मुक्ता जहागिरदार | वनिता चोरे | प्रशांत हरमकर

# अनुक्रमणिका


| | लेखाचे शीर्षक | लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १) | भांडवलशाही आणि रोजगाराचा प्रश्न | श्रीनिवास खांदेवाले | १ |
| २) | व्यापार उदारीकरण आणि रोजगाराचा वादप्रश्न | प्रशांत हरमकर | ८ |
| ३) | रोजगाराची बदलती रचना आणि श्रमिक कायद्यातील संभाव्य सुधार | विनायक देशपांडे | २७ |
| ४) | जागतिकीकरणपूर्व व जागतिकीकरणोत्तर रोजगार धोरण | वनिता चोरे | ३७ |
| ५) | अमर्त्य सेन यांच्या रोजगारविषयक विचारांचे अवलोकन | आश्लेषा कुळकर्णी | ५० |
| ६) | जे.एम. केन्स यांचे रोजगार विषयक विवेचन | राजश्री रायभोग | ५८ |
| ७) | प्रश्न रोजगाराचा - चिंतन प्रो. व्ही.के.आर.व्ही.राव आणि प्रो.अमित भादुरींचे | मुक्ता जहागिरदार | ६६ |
| ८) | आंतर्राष्ट्रीय श्रम संघटनेचा (ILO) २०१८ चा अहवाल आणि भारतातील रोजगार स्थिती | धनश्री महाजन | ८७ |
| ९) | तंत्रज्ञान विकास व रोजगार-यंत्रमानव युगाच्या संदर्भात | अंजली कुळकर्णी | ९२ |
| १०) | भिन्न देशांतील रोजगार स्थिती - एक दृष्टीक्षेप | मंजूषा मुसमाडे | १०० |
| ११) | भारतातील सद्यकालीन रोजगारस्थितीचे अनुभवनिष्ठ आणि सैद्धांतिक विवेचन | विश्वजीत कदम | ११२ |
| १२) | भारतीय अर्थव्यवस्थेतील रोजगार संबधी बदलांचा आढावा (१९९१ - २०११) | कपिल चांद्रायण | १३६ |

# व्यापार उदारीकरण आणि रोजगाराचा वादप्रश्न

**प्रशांत हरमकर**

**प्रस्तावना :**

सामान्यपणे दिसून येते की व्यापार उदारीकरण बाजाराचा विस्तार घडवून आणतो. शिवाय आर्थिक मापकाच्या आधारावरच जागतिक अर्थव्यवस्थेला पुढाकार मिळतो. ॲडम स्मिथने अशा प्रकारची चर्चा २०० वर्षापूर्वी केली होती. उदारीकरणामुळे उत्पादनाची कार्यक्षमता वाढते आणि विनिमय घडून येतो. व्यापार उदारीकरणातून सुरक्षितपणे व्यापाराचे व्यवस्थापन घडून येते. मात्र खात्रीशीरपणे विकसनशील देशांना लाभ प्राप्त होईल का हा प्रश्न अनुत्तरित राहतो. दोहा फेरीमध्ये बाजार प्रवेशाचा वादप्रश्न महत्त्वाचा राहिला. ज्यावर अजूनपर्यंत समाधानकारक तोडगा काढता आला नाही. प्रत्येकच देशाला व्यापार उदारीकरणाचे लाभ प्राप्त झाले असे दिसून येत नाही. स्पर्धा, भांडवल निर्मिती आणि बाजार जोखमीच्या अंतर्गत रोजगार प्राप्ती करून देता आली नाही. रोजगार निर्मितीच्या बाबत व्यापार उदारीकरणाचे समाधानकारक चित्र विकसित आणि विकसनशील देशामध्ये दिसत नाही. व्यापार उदारीकरण हा आर्थिक उदारीकरणाचा एक भाग आहे.

**विभाग 'अ'**

**व्यापार उदारीकरण आणि श्रमिक गतिशीलता :**

व्यापार सेवांच्या सामान्य करारातर्गत चार मोड (Mode) ची प्रस्तुतता केली आहे. मोड-४ (Mode -4) मध्ये रोजगाराकरिता श्रमिक एका देशातून दुसऱ्या देशामध्ये जाण्याला तात्पुरती गतिशीलता असे म्हटले आहे. श्रमिकाची गतिशीलता कशी आहे यावर उत्पादकता अवलंबून असते. श्रमिकाची गतिशीलता जेवढी जास्त असेल तेवढी जागतिक उत्पादकता वाढविण्यास मदत करते. उत्पादन घटकांच्या गतिशीलतेवर त्याचे देयक (Payment) ठरते जर सीमांत उत्पादकते एवढी घटक देयकता (Factor Payment) असेल तर कुशल श्रमिकांपेक्षा अकुशल श्रमिकामध्ये देयकाबाबत (मोबदला) फार तफावत राहते. गॅटस (GATS) करारामध्ये श्रमिकांच्या गतिशीलतेच्या बाबत तरतूद केलेली आहे. ज्यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेची गतिशीलता वाढते.

उदारीकरणातून घडून येणाऱ्या आर्थिक सुधारणामुळे विकासाची प्रचंड क्षमता वाढते. निगमामुळे कुशल श्रमिकांची मोठ्या प्रमाणात गतिशीलता घडून येते. रोजगाराकरिता

कुशल श्रमिकांचे स्थलांतरण घडून येणे हा विकसनशील देशांकरिता हिताचा वादप्रश्न आहे. विकसनशील देश तुलनात्मक लाभ घेण्याचा प्रयत्न करीत असतात. मात्र या दृष्टिकोनातून मोड-४ फार विकसित केलेला नाही. त्यामुळे तुलनात्मक लाभ न्यून पातळीचा प्राप्त होतात. याउलट मध्यम कौशल्य प्राप्त श्रमिकांना प्रोत्साहने दिलेली आहे. स्थलांतरित झालेले विकसनशील देशातील श्रमिक त्यांच्या कुटुंबांना पैसे पाठवितात. पाठविलेल्या रकमेचे मूल्य (value of remittence) आणि विकसनशील देशावरील परिणाम यामध्ये शासनाला महत्त्वाची भूमिका पार पाडावी लागते. पाठविणाऱ्याच्या रक्कम प्रवाहाच्या (remittance flow) सुसूत्रीकरण संरचनेचा परिणाम घडून येतो. हा परिणाम श्रमिकाच्या चालू गतिशीलतेवर (current movement) घडून येतो. श्रमिकांच्या स्थलांतरणातून प्राप्त होणारा निधी हस्तांतरीत करण्यास सोपा आणि सुरक्षित असतो. शासन स्थलांतरीताना सुरक्षित प्रवेश आणि न्यून व्यय वित्तीय सेवा देते. सोबतच जे अडथळे असतील त्यावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. याचा परिणाम असा घडून येतो की, पाठविलेल्या रक्कमांचा प्रवाह वाढतो. त्याबाबत धोरणे तयार केली जातात. अंतिमतः त्याचा परिणाम श्रमिकांच्या स्थलांतरणावर घडून येतो. यातून सूक्ष्म वित्त, सूक्ष्म उद्यम यांना प्रोत्साहन मिळते. ज्यामुळे लहान व्यावसायिकाचा प्रवेश बचत आणि ऋण खात्यामध्ये होतो. पैसे पाठविणाऱ्याच्या विकासाचा कणा हा विकसनशील देशाची तरलता कशा प्रकारची आहे त्यावर अवलंबून असतो. जर बाह्य वित्त स्वस्तात उपलब्ध होत असेल तरच पाठविणाऱ्याचा वित्तीय प्रवाह वाढू शकतो.

श्रमिकांच्या गतिशीलतेला सुविधा असायला पाहिजे. मोड ४ अंतर्गत उदारीकरणाचा विस्तार घडून येतो. यानुसार विकसनशील देशातील सेवा उद्योग व्यापाराला चालना मिळते. श्रमिकाची गतिशीलता वाढते. विकसनशील देशांच्या समग्र देशीय उत्पादाच्या (GDP) ५० प्रतिशत वाटा सेवा उद्योगाचा आहे. यापैकी २५ प्रतिशत निर्याती विकसनशील देश जागतिक पातळीवर करतात. १९९० च्या दशकामध्ये उच्च कौशल्य सेवांचे उदारीकरण करण्यात आले. मात्र फारच थोडी प्रगती अकुशल श्रमाधिक्य सेवांच्या बाबतीत घडून आली.

सेवा क्षेत्राच्या उदारीकरणाचा लाभ मिळतो. हा लाभ विकसनशील देशांना मिळायला पाहिजे. याबाबतचे अनुभवनिष्ठ अध्ययन करण्यात आलेले आहे. सेवा क्षेत्राच्या उदारीकरणानंतर कृषी आणि निर्माणी क्षेत्राच्या तुलनेत अधिक क्षमता दिसून आली. याचे लाभ विकसनशील देशांना प्राप्त झाले. संरक्षणाची उच्चतम पातळी असून देखील जागतिक व्यापारामध्ये सेवा क्षेत्राचा वाटा वृद्धींगत होत राहिला आहे. कारण

आधिक्याने सेवाक्षेत्र उत्पादनाचे आदान आहे.

सेवा क्षेत्राच्या उदारीकरणामुळे मोठे लाभ प्राप्त होणार आहे असे भविष्यकथन करण्यात आले होते. ह्याचा संबंध सेवा क्षेत्रातील सुधारणाच्या गुंतागुंतीशी देखील आहे. निर्माणी वस्तूच्या व्यापारापेक्षा सेवा क्षेत्रातील नियंत्रणे अधिक क्लिष्ट आहेत. व्यापार नियंत्रणाची ओळख होणे व ती काढून टाकता आली पाहिजे. याचा संबंध तीन बाबीशी आहे. पहिले असे की, जागतिक व्यापार संघटनेच्या वाटाघाटी अंतर्गत सेवा क्षेत्रातील सुधारणा कृतिशील आहे. यामुळे सुधारणाचे तुकडे घडून आलेले आहे. दुसरे, सुधारणाच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये महत्त्वाच्या तत्त्वाचा विचार केला आहे. मोड-३ अंतर्गत प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीवरील नियंत्रणे काढून टाकायची आहे. जागतिक व्यापार संघटनेच्या एकाच बाजूने घडवून आणलेल्या (unilateral) धोरणामध्ये बाह्य बाजूला बदल घडून येत होते. तिसरे, बहुपक्षीय व्यापाराला महत्त्व आहे. कारण याबाबत सुधारणा घडून आणाव्या असा विकसनशील देशांवर दबाव आहे. मात्र व्यापार सुधारणाचे हे बोथट (blunt) साधन आहे. देशनिहाय उदारीकरणाचे धोरण राबवितांना लवचिकतेचा अभाव आहे. संपूर्ण कार्यक्रम पत्रिकेमध्ये गॅट बांधीलकीला (GATS Committment) न्यूनतम पातळीवर ठेवलेले आहे. विकसनशील देशाच्या सेवा निर्याती वृद्धीगत होण्यामध्ये हित दडलेले आहे. ज्याला अंतर्गत दर (under rate) आहे. मात्र देशांच्या वाटाघाटीमध्ये कार्यक्रम पत्रिकेलाच पांगविले आहे. विकसनशील देशांना कल्याणकारी लाभ प्राप्त होण्याकरिता एकात्मिक सुधारणा व सुविधांची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

दोहा फेरीचा पिच्छा पुरवून अनेक विकसनशील देशांनी निर्यात वृद्धी घडवून लाभ प्राप्त केले आहे. विशेषत: बाह्यस्त्रोत (outsourcing) च्या बाबत पर्याप्त प्रमाणात वृद्धी घडवून आलेली होती. (मोड-१ आणि २ अंतर्गत) माहिती तंत्रज्ञान आणि व्यावसायिक सेवांमध्ये विकसनशील देशांच्या निर्यातीचा उच्चतम दर आहे. मात्र तरीसुद्धा आरोग्य, शिक्षण, audiovisual service यावर व्यापार नियंत्रणे आहे. राष्ट्रीय अधिकार स्थानिक अधिकार, नियंत्रणाची मानके याचा विचार मोड ३ अंतर्गत झालेला आहे.उरूग्वे फेरीमध्ये अनेक क्षेत्र मोड-१ अंतर्गत होती. दरामधील बांधिलकीचा संबंध आंशिक बाजार प्रवेशाशी आहे. ज्याअंतर्गत विकसनशील देशांना ६० प्रतिशत कायदेशीर सेवा, ७८ प्रतिशत दूरध्वनी सेवा आणि ४१ प्रतिशत अंकेक्षण सेवांमध्ये प्रवेश मिळून तुलनात्मक लाभ प्राप्त करता आला आहे. राष्ट्रीय वागणूक (National Treatment) आणि बाजार प्रवेशांतर्गत समता प्राप्त करून देण्याचे सुसूत्रीकरण

यामध्ये आहे.

बाजारेत्तर प्रवेश सुधारणा या सेवा क्षेत्रातील सुधारणा व विकसनशील देशातील लाभ यांना प्रोत्साहन देणाऱ्या आहे. विकसनशील देशाकरिता पर्यटन क्षेत्र विदेशी विनिमय प्राप्त करून देण्याचे महत्त्वाचे स्रोत आहे. व्यापार निर्बंधाच्या अटीमधून हे क्षेत्र मुक्त आहे. मात्र स्पर्धाविरोधी तत्त्वामुळे काही क्षेत्रात विकसनशील देशांना व्यथा सहन कराव्या लागत आहे.ज्यामुळे न्यूनतम आधिक्य प्राप्त होते. मात्र सामूहिक उत्पादने आणि परिवहन क्षेत्र बहुपक्षीय विरोधी चौकटमध्ये आहे. म्हणून विकसनशील देशांना सेवा देण्याच्या निर्यातीतून लाभ प्राप्त करायचे असेल तर एकात्मिक उदारीकरण घडून येणे आवश्यक आहे. मोड-३ अंतर्गत प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीच्या उदारीकरणाबाबत तरतुदी दिलेल्या आहे. हा मार्ग सोडून काही नकारात्मक प्रभावाचे अनुभवनिष्ठ विश्लेषण आहे. विदेशी गुंतवणुकीवर एकात्मिक उदारीकरणाची बंधने आहेत कारण याशिवाय बहुपक्षीय कृती होऊ शकत नाही. यातून विकसनशील देशांना लाभ प्राप्त करण्याकरिता संधी आहेत. प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीकरिता करारामध्ये सुधारणा केल्या आहे. ज्यामधून गुंतवणुकीकरिता स्पर्धा निर्माण करण्यात आलेली आहे. तरी देखील करारामध्ये विश्वास विरोधी (anti-trust enforcement) तरतूदी प्रस्तुत होतात.

सेवा क्षेत्रामध्ये सुधारणा घडून येण्याची आवश्यकता आहे. त्याचा परिणाम व्यापारावर होऊन व्यापार विस्तार घडून येतो. सेवा क्षेत्रातील सुधारणा म्हणजे राष्ट्रीय अर्थव्यवस्था आणि सामाजिक धोरणाबाबत पुढाकार घेणे आहे. सेवा क्षेत्रामध्ये काही विदेशी कंपन्याचे नियंत्रण प्रस्थापित झालेले आहे. अशा विदेशी कंपन्यांच्या संपत्तीचा उपयोग आणि उदारीकरणाचा परिणाम गरिबांवर घडून येतो. जो सामाजिक परिणाम आहे. महत्त्वाच्या सेवांच्या किंमती सातत्याने वाढतात किंवा काहींच्या बाजार प्रवेशामध्ये कपात घडून येते. विशेषत: वित्तीय सेवांबाबत स्पर्धेमध्ये कपात घडून येते आणि किंमती वाढत जातात. याचा एकत्रित परिणाम असा घडून येतो की लहान आणि मध्यम उदयमाच्या कर्जपुरवठ्यात कपात घडून येते त्यामुळे गरीब आणि ग्रामीण क्षेत्रामध्ये कर्जपुरवठा होत नाही. म्हणून या न्यूनतम पातळीवर उदारीकरणाला पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. न्युनत्तम किंमती या स्पर्धात्मकता आणि कार्यक्षमता वाढवित असतात. जागतिक व्यापार संघटनेतंर्गत उदारीकरणाला प्रोत्साहन मिळत असताना प्रत्यक्ष कृती ही सुसहय्य असायला पाहिजे. त्यामधील कटुता कमी केल्या गेली पाहिजे. कारण याचा संबंध दोहा कार्यक्रम पत्रिकेशी आहे. नियंत्रित कराराचा (Regulatory Agreement) संबंध हा शासनाच्या योग्यतेशी आहे. पर्याप्त औद्योगिक, सामाजिक

आणि पुर्नवितरणाच्या धोरणामध्ये कपात करून उदारीकरणाचा कार्यक्रम राबविला जातो. याचा संबंध उत्पादन व्यय जुळवून घेण्याशी आहे.

सेवा क्षेत्रामधील सुधारणा विकसनशील देशांना मोठा लाभ प्राप्त करून देण्याच्या संधी निर्माण करतात. मात्र दोहा फेरीला स्थिरावस्था प्राप्त झाली. त्यामुळे सेवा क्षेत्रातील लाभ सर्वांपर्यंत पोहचू शकले नाही. समाविष्ट असणाऱ्या बाजार प्रवेश कार्यक्रमपत्रिकेचा पिच्छा विकसनशील देशांना पुरवावा लागणार आहे. कारण कार्यक्रमपत्रिकेमध्ये सुधारणावर भर देऊन श्रमधिष्ठित सेवा आणि बाह्यस्त्रोत सेवांना (outsourcing) प्रोत्साहन दिले आहे. कार्यक्रम पत्रिकेचा विस्तार करताना सेवा क्षेत्राच्या उदारीकरणाचे लाभ आणि उत्पादन व्ययावर मर्यादा आहे.

**श्रमिक स्थलांतरण गॅटस् अंतर्गत :**

गॅट्स (GATS) अंतर्गत चार मोड ला मान्यता देण्यात आलेली आहे. तात्पुरते स्थलांतरण मोड -४ अंतर्गत येते. व्यापार अटिमधील हा एक लहानसा भाग आहे. उच्च कौशल्य श्रमिक आणि व्यापार कार्यकारणीच्या स्थलांतरणाला मर्यादित प्रमाणात सहमती देतात. विकसनशील देश मोड-४ अंतर्गत न्यून-मध्यम कौशल्य सेवांचा पुरवठा तुलनात्मक लाभाच्या आधारावर करतात. यामुळे विकसनशील देशांना कल्याणकारी लाभ प्राप्त होऊ शकतात. विकसित देशांमध्ये श्रमिक पुरवठा आवश्यकतेपेक्षा कमी असतो. त्यामुळे विकसनशील देशाकडून कमी कौशल्य श्रमिक पुरवठा झाला तर जागतिक कल्याण दशलक्ष डॉलरने वाढू शकते. हे कल्याण मोड-४ अंतर्गत श्रमिकांच्या प्रवेशावर अवलंबून आहे. श्रमिकांचा प्रवेश (स्थलांतरण ) तीन वर्गीकरणात होतो.

१) विकसित देशाकडून विकसनशील देशाकडे श्रमिक स्थलांतरण

२) कुशल श्रमिकाचे विकसनशील देशाकडून विकसित देशाकडे स्थलांतरण

३) अकुशल श्रमिकाचे विकसनशील देशाकडून विकसित देशाकडे स्थलांतरण

ह्याचा सविस्तरपणे विचार आपण करणार आहोत.

**१) विकसित देशाकडून विकसनशील देशाकडे श्रमिक स्थलांतरण :**

या वर्गीकरणातंर्गत उच्च कौशल्य तंत्रज्ञ किंवा व्यवस्थापक कामानिमित्ताने स्थलांतरण करतात. कायदेशीर सल्लागार म्हणून बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या व्यवस्थापनामध्ये असतात. विकसनशील देशामध्ये त्यांच्या कौशल्याचा वापर केल्या जातो.

**२) कुशल श्रमिकाचे विकसनशील देशाकडून विकसित देशाकडे स्थलांतरण :**

कुशल श्रमिकाचे विकसनशील देशाकडून विकसित देशाकडे स्थलातरण होते. याकरिता विकसित देश कृतीशीलपणे प्रोत्साहने देतात. इंग्लडंच्या आरोग्य व्यवस्थेमध्ये

३० प्रतिशत डॉक्टर आणि परिचारिका बाहेर देशामधून स्थलांतरित होऊन आलेले आहेत. शिवाय इंग्लंडच्या विद्यापीठीय शैक्षणिक व्यवस्थेमध्ये १२ प्रतिशत आस्थापनेवर प्राध्यापक स्थलांतरण होऊन आलेले आहे. विकसनशील देशाकडून कुशल श्रमाचा विकसित देशाकडे होणारा पुरवठा म्हणजे बौद्धिक निस्सारण (Brain drain) आहे. यामुळे स्थानिक पातळीचे कौशल्य नष्ट होते. देशीय उच्च कौशल्याच्या स्पर्धात्मकतेचा ऱ्हास घडून येतो. कर प्राप्त उत्पन्न घटकाची झीज घडून येते. कुशल श्रमिकाचा विस्तार घडून येणे हा इतर उत्पादन घटकांना प्रोत्साहन देत असतो. देसाई, कपूर आणि मॅकल्हे याच्या अध्ययनानुसार १ दशलक्ष भारतीय अमेरिकेमध्ये जीविकेसाठी राहतात. त्याची उत्पन्न प्राप्ती भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या १० प्रतिशत आहे. दुसऱ्या बाजूला विकसनशील देशामधून कुशल श्रमिकांचे स्थलांतरण होऊन त्यांना लाभ प्राप्त होतात. विदेशामध्ये घेतलेल्या उच्च शिक्षणामुळे परतावा प्राप्त होतो. मात्र याकरिता मानवी भांडवलामध्ये अधिक गुंतवणूक करावी लागते.

कुशल श्रमिकांच्या स्थलांतरणाचा लाभ त्याच्या कुटुंबाना प्राप्त होतो. आंतर अमेरिकन विकास बँक (Inter-American Development Bank) च्या नुसार कुशल श्रमिकाद्वारे कुटुंबाना मिळणारा परतावा लॅटिन अमेरिकन आणि कॅरिबियन देशांमध्ये ३२ अब्ज अमेरिकन डॉलर (२००२ मध्ये) असल्याचे म्हटल्या गेले होते. या प्रकारे कुशल श्रमिक स्थलांतरण विकास प्रक्रियेला मदतच असते. मात्र प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीपेक्षा ही मदत कमी असते. चीनच्या संदर्भात विचार कला तर आर्थिक वृद्धी व राष्ट्रीय उभारणीमध्ये कुशल श्रमिकाचे महत्त्वाचे योगदान आहे. चीनमधील ५० दशलक्ष कुशल श्रमिक विदेशामध्ये वास्तव्यास आहे. ह्याचा आर्थिक लाभ तर प्राप्त होतो पण त्यापेक्षा भांडवल निर्मिती व्यावसायिक अनुभव आणि आंतरजाल जोडणी यामुळे अर्थव्यवस्थेला लाभ प्राप्त होतो.

**३) अकुशल श्रमिकांचे विकसनशील देशाकडून विकसित देशांकडे स्थलांतरण :**

अकुशल श्रमिकांची गतिशीलता विकसनशील देशांकडून विकसित देशांकडे असते तेव्हा त्याचे मोठे लाभ त्यांना प्राप्त होतात. यामुळे फार मोठी भिन्नता उत्पादन घटकाच्या किंमती मध्ये निर्माण होते. ह्यातून श्रमिकाच्या गतिशीलेचा विस्तार घडून येतो. अकुशल श्रमिकाच्या लाभ आणि व्ययाच्या आधारावर विचार केला तर त्याचे फार मोठे लाभ प्राप्त होतात. विकसित देशामध्ये श्रमाचे महत्त्वाचे स्रोत म्हणजे विदेशी श्रमिकच आहे. लंडनचा कॅटरिंग (catering) उद्योग संपूर्णपणे विदेशी श्रमिक स्थलांतरणावर अवलंबून आहे. कारण यामध्ये ७० प्रतिशत विदेशी श्रमिक आहे.

देशातील मोठ्या वेतन तफावतीशी आहे. स्थलांतरणाच्या विस्तारावर उदारीकरणामध्ये मर्यादा आहे. त्यामुळे विकसनशील देशातील श्रमिकांच्या गतिशीलतेवर बंधने आहेत. परिणामत: स्थलांतरणाच्या लाभामध्ये घसरण होते. पैसे पाठविणाऱ्यामुळे मोठे लाभ प्राप्त झाले. ज्यामुळे स्थलांतरिताच्या जीवनमानाचा दर्जा आणि अधिकारामध्ये सुधारणा झाल्या आहे. श्रमिकांच्या स्थलांतरणाचा वादप्रश्न विकसनशील देशाच्या कल्याण व लाभाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा आहे.

### विभाग 'ब'

**कृषिक्षेत्राचे उदारीकरण :**

कृषी क्षेत्राला संरक्षण OECD देशांमध्ये उच्चतम पातळीवर आहे. विकसनशील देश कृषी प्रधान देश आहे. कृषिक्षेत्राचा GDP मधील सरासरी वाटा ४० प्रतिशत आहे. एकूण निर्यातीमध्ये कृषी निर्यातीचा वाटा ३५ प्रतिशत तर कृषी क्षेत्रामध्ये रोजगाराचे प्रमाण ७० प्रतिशत आहे. विकसनशील देशामध्ये रोजगार आणि आर्थिक विकास या दोहोच्या दृष्टिकोनातून कृषी क्षेत्र महत्त्वाचे आहे. म्हणूनच कृषी क्षेत्रामधील सुधारणा काळजीपूर्वक कराव्या अशा सूचना जोसेफ स्टिगलिझ ह्यांनी देखील केलेल्या आहे. कृषी क्षेत्रातील उदारीकरण विकसनशील देशांना प्रस्तुत करते. विकसनशील देशांचा बाजार प्रवेश वाढला तरच त्यांना लाभ प्राप्त होऊ शकतात. देशीय उत्पादकाची क्षमता असताना देखील विकसीत देश उच्चतम अर्थसहाय्य देऊन कृषी वस्तूच्या किमतीत कपात करतात. यामुळे विकसनशील देशातील गरीब शेतकऱ्यांना हानी पोहचते. एकूणच विकसनशील देशातील नागरी उपभोक्तापेक्षा त्याची स्थिती अधिक वाईट असते. विकसनशील देशांच्या मर्यादित क्षमताचा परिणाम पुर्नवितरणावर घडून येतो. प्रतिकूल वितरण झाल्यामुळे शेतकऱ्याच्या कल्याणामध्ये घट घडून येते.

जागतिक व्यापार संघटनेद्वारे उदारीकरणावर प्रकाश टाकला तर मोठ्या कृषी उत्पादकावर सकारात्मक परिणाम घडून आला आणि लहान उत्पादकावर प्रतिकूल परिणाम घडून आल्याचे दिसून येते. सुधारणाचा (Reform) एकूणच परिणाम संरक्षणाच्या पातळीवर अवलंबून आहे. शिवाय उदारीकरणाचा किंमतीवर देखील परिणाम घडून येतो. उदारीकरणाचे कल्याणात्मक लाभ ठरवीत असताना देशांना कृषी व्यापारामध्ये संतुलन निर्माण करायचे आहे. कृषी उत्पादनाचे विभाजन समशीतोष्ण उत्पादने आणि उष्णकटीबंधीय उत्पादनांमध्ये झालेले आहे. बहुतांश विकसनशील देश उष्णकटीबंधामध्ये मोडतात. विकसनशील देश समशीतोष्ण कृषी उत्पादने याची आयात करतात. तर उष्णकटिबंधीय कृषी उत्पादनाची निर्यात विकसित देशांना करतात. विकसित देश मोठ्या

प्रमाणात देशीय अर्थसहाय्य देतात शिवाय विकसनशील देशांना व्यापार अटी प्रतिकूल होत असल्यामुळे ते अत्यंत वाईट स्थितीत जातात. विकसनशील देशांना केवळ प्राथमिक लाभ प्राप्त होत असल्याचे दिमारनन, हर्टेल आणि किनी यांनी स्पष्ट केले आहे.

कृषी क्षेत्रामध्ये सुधारणा घडवून आणल्या तर हानी विकसनशील देशांना आहे. त्यामुळे कृषी सुधारणाबाबत निवडक आणि टप्प्याटप्पयाने बदल घडवून आणण्याच्या दृष्टिकोनाची गरज आहे. कृषी अर्थसहाय्ये काढून टाकायला पाहिजे कारण त्याचा लाभ केवळ उपभोगक्तांना मिळतो. तसाच त्याचा परिणाम उत्पादन व्ययावर होतो. प्रशुल्क आणि कोटावर प्रकाश टाकला तर यांतर्गत विकसित देशांना उष्णकटिबंधीय उत्पादने, प्रक्रिया अन्न आणि इतर उत्पादनाची निर्यात केल्या जाते. या उत्पादनाची उच्च निर्यात लवचिकता आहे. जी की किंमतीशी निगडीत आहे. कापूसाच्या किंमती तेव्हाच वाढतील जेव्हा कापूस अर्थसहाय्य काढून घेतल्या जाईल. कापूस अर्थसहाय्याचा परिणाम विकसनशील देशातील लहान शेतकऱ्यावर होऊन त्यांचा जीवनमानाचा दर्जा घटतो. हा प्रतिकूल वितरणाचा परिणाम आहे. उदारीकरणामुळे गरीब देशाच्या व्यापार अटी प्रतिकूल झाल्या. ज्यामुळे गरीब विकसनशील देशातील शेतकऱ्याचे उत्पन्न तीव्रतेने घटले आहे.

व्यापार उदारीकरणाद्वारे कृषी उत्पादकांना लाभ प्राप्त करून द्यायचे असेल तर प्रशुल्क आणि अर्थसहाय्य यामध्ये कपात घडून येण्याची आवश्यकता आहे. ह्यामुळे कृषी वस्तूच्या किंमती वाढून त्याचा लाभ विकसनशील देशातील कृषी उत्पादकांना प्राप्त होईल. विकसनशील देश देशीय अर्थसहाय्यित कृषी उत्पादनाचे उपभोक्ते आहे. उदा. तेलबिया. अशा उत्पादनाच्या किंमती संवेदनशील असल्यामुळे त्याच्या अर्थसहाय्यामध्ये कपात होण्याची आवश्यकता आहे.

विकसित देशाकडे मोठ्या प्रमाणात साधने ही उत्पन्नाचे पुर्नवितरण आणि दारिद्र कमी करण्याकरिता असतात. मात्र न्यून विकसित व विकसनशील देशांमध्ये याच्या विरूद्ध स्थिती असते. परिस्थिती लक्षात घेऊन या देशांना साधनाची मांडणी करावी लागते. विकसनशील देशामध्ये गरीब लोक कृषी उत्पादक आहे. कृषी उत्पादकांना किंमती वाढून उत्पन्न मिळाले तर ग्रामीण भागातील दारिद्यामध्ये कपात घडून येईल. विकसनशील देशाकरिता कृषी उत्पादकाना उच्चतम किंमत प्राप्त होणे हेच दारिद्र कपातीचे साधन आहे.

**प्रशुल्केतर नियंत्रणे :**

विकसनशील देशांवर प्रशुल्केत्तरे व्यापक प्रतिकूल परिणाम घडवून आणतात. त्यांना राशीपातनाचा सामना करावा लागतो. जो की राशीपातन प्रशुल्केत्तर नियंत्रणे

आहे. याप्रकारची नियंत्रणे अमेरिका चीन विरूद्ध लावतो. ह्याचा विकासावर प्रतिकूल परिणाम घडून येतो. सातत्याने निर्यातीना प्रशुल्केत्तराचा सामना करावा लागतो. जागतिक व्यापार संघटनेच्या कार्यक्रम पत्रिकेवर प्रशुल्केत्तरे नेहमीच वाटाघाटीमध्ये राहिलेली आहे. राशीपातनाचे दर, प्रतिसंतुलनकारी दर, संरक्षक (safeguard) अन्न सुरक्षा ही नियंत्रणे प्रशुल्केत्तर आहे. याअंतर्गत विकसित देश विकसनशील देशाकडून होणाऱ्या निर्यातीवर निर्बंध लादत असतात. या निर्बधामुळे स्पर्धा नष्ट होते. समता व्यापार (fair trade) घडवून आणण्याचा प्रयत्न केला जातो मात्र प्रत्यक्षात असमता व्यापार (un-fair trade) घडून येतो. व्यापार उदारीकरणाचा आघात विकसनशील देशांवर होऊन त्यांचा रोजगार वृद्धी दर घटतो.

**औद्योगिक वस्तूचे उदारीकरण :**

विकसित देशाची प्रशुल्के न्यूनतम पातळीवर असतात, मात्र विकसनशील देशांच्या निर्यातीवर उच्चतम नियंत्रणे लावली जातात. विकसनशील देश निर्यातीवर लावलेल्या उच्चतम नियंत्रणाचा सामना करीत आहे. विशेषत: ही नियंत्रणे प्रक्रिया अन्न आणि न्यून कौशल्य निर्माणी वस्तूवर लावली जातात. २००१ मध्ये कपडे आणि जोडे एकूण आयातीच्या ६.५ प्रतिशत होते. मात्र ते अर्ध्यावर आणून २० अब्ज डॉलर प्रशुल्क लावण्यात आले. आयातीवर आधिक्याने अमेरिकन शासन प्रशुल्क आकारते.

प्रशुल्काच्या आधारावर विरूपणे संपूर्णपणे सांगता येत नाही. कारण प्रशुल्क संरचना उत्तरोत्तर विस्तारणारी आहे. प्रक्रिया उत्पादनावर मूल्यवर्धित प्रशुल्के लावली जातात तर प्राथमिक वस्तूवर उच्चतम प्रशुल्के लावली गेली आहे. यामुळे गरीब देशांच्या उद्योग विविधीकरणांवर निर्बंध येतात. ज्यातून असमताच घडून येते.

**दारिद्र्य आणि श्रम बाजार :**

व्यापार उदारीकरणाचा परिणाम कोणत्या सामाजिक गटावर घडून आला ह्याची ओळख करणे सोपे नाही. समांतर सुधारणांचा परिणाम घटक अभिदानावर होतो. व्यापाराचा आकृतिबंध एकजिनसी नाही ह्याचा अंतिमत: परिणाम विविध देशातील सामाजिक गटावर पडतो. व्यापार सुधारणांमुळे सामाजिक गट प्रभावित होतात. हा परिणाम अल्पकालीन आणि दीर्घकालीन दोन्ही प्रकारचा असतो. ह्याचा सर्वात जास्त परिणाम दुर्बलांवर होतो. व्यापार सुधारणांमुळे हानी होणाऱ्याचे प्रमाण वाढते. ज्याचा परिणाम उत्पन्न स्रोत, खर्च आणि रोजगाराच्या आकृतिबंधावर होतो.

कामगारावर परिणाम घडून वेतन दर आणि बेरोजगाराचा दर प्रभावित होतो. बाजारासोबत जुळवून घेता न आल्यामुळे उदारीकरणामुळे अनेक लोकांचे रोजगार गेले.

रोजगार निर्मितीपेक्षा रोजगार जाण्याचा दर अधिक होता. त्यामुळे बेरोजगारीचे प्रमाण वाढले. विशेषत: ही स्थिती विकसनशील देशामध्ये जास्त दिसून आली. कारण विकसनशील देशामधील वित्तीय बाजार दुर्बल होता. त्यामुळे उत्पादक पेढ्या नवीन संधी आणि व्यापार कराराचे लगेच फायदे घेऊ शकत नव्हत्या. सोबतच कडक मौद्रिक धोरण होते. संरचनात्मक जुळवणूकीचा हा कार्यक्रम असल्यामुळे रोजगार निर्मितीपेक्षा रोजगार नष्ट पावण्याची स्थिती प्रखर झालेली होती. जी नवीन रोजगार निर्मिती घडून येत होती त्याला विविध कौशल्याची आवश्यकता होती. याला भिन्न स्थानिय कौशल्य निर्मितीची आवश्यकता होती. प्रत्यक्षात अकुशल श्रमिकाचे प्रमाण जास्त असल्यामुळे श्रमिकाची अवस्था विस्कळीत झाली होती. पुढारलेल्या औद्योगिक देशामध्ये न्यूनतम बेरोजगाराचा दर जरी असला तरी अकुशल श्रमिकाकरिता वेतन दर आंकुचन पावले होते. या व्यथा तेथील श्रमिकांना सहन कराव्या लागत होत्या.

आर्थिक सिद्धांतानुसार अर्थव्यवस्थेमध्ये पूर्ण रोजगार असतो. व्यापार उदारीकरण बाजारामध्ये उत्पादन घटकाची किंमत समानीकरण घडवून आणतो. मात्र अल्पविकसित देशामध्ये अकुशल श्रमिकांना उच्च वेतन दर असतात तर विकसित देशामध्ये अकुशल श्रमाला न्यूनतम वेतन दर दिले जातात यामुळे देशाच्या स्पर्धात्मक लाभाचे शोषण होऊ शकते. बाजार अपूर्ण आहे. अपूर्ण बाजारामध्ये अपूर्ण स्पर्धा आणि अपूर्ण जोखमी आहे. स्टिगलिझ आणि न्युबेरीच्या नुसार अपूर्ण जोखमी बाजार उदारीकरणाला वाईट स्थितीत ढकलतात.

व्यापार उदारीकरणामुळे उत्पादन कार्यक्षमता वाढते हा सकारात्मक परिणाम आहे. मात्र उत्पादन वृद्धीमध्ये दीर्घकाळात शाश्वतता राहील हे सांगता येत नाही. व्यापार उदारीकरणामध्ये फार लहरीपणा आहे. मंद उत्पादन वृद्धीचा दर देखील अनेक देशांमध्ये राहिला आहे. अनुभवनिष्ट अध्ययनावरून असेही दिसून आले की, खुल्या व्यापारामुळे उत्पादन वृद्धी घडून आली मात्र दीर्घकाळात वेतन दर वाढले नाही. त्यामुळे खुला व्यापार, उत्पादकता आणि वेतन दर यामध्ये विरोधाभासी संबंध राहिला आहे. विशेषत: गरीब व न्यून विकसित देशांमध्ये खुला व्यापार उत्पादकता आणि वेतन दर ह्याचा वाईट प्रतिसाद राहिला आहे.

चीनच्या संदर्भात विचार केला तर जागतिक व्यापार संघटनेचा सभासद झाल्यानंतर चीनची निर्यात स्पर्धा वाढली. यामुळे चीनमध्ये न्यून कौशल्य श्रमिकाचे वेतन दर घटविले. यामुळे श्रमिकांना ज्यादा वेळ (over time) काम करावे लागले. आर्थिक सुधारणा महत्त्वाकांक्षी पातळीवर घडवून आणल्या. ह्याचे लाभ जरी चीनला

मिळाले असले तरी ही धोक्याची सूचना होती. बाजार अपूर्णतेचे वैशिष्ट्य चीनच्या उदारीकरणामध्ये दिसून आले.

व्यापार उदारीकरणाचा परिणाम हा गुंतागुंतीचा आहे. श्रमिकांना काही लाभ तर काही तोटे देखील प्राप्त होतात. गरीब व गरीब देशांना लाभ प्राप्त होणे म्हणजे त्यांच्या प्रतिव्यक्ती उत्पन्नामध्ये वाढ होणे होय. मात्र व्यापार उदारीकरणामुळे जागतिक पातळीवर असमानता वाढत गेलेली आहे. विशेषत्वाने अर्जन्टिना, चिली, कोलंबिया, कोस्टारिका आणि उरूग्वे मधील असमानता वाढत गेलेली आहे. नाफ्टाशी (NAFTA) व्यापार करार केल्यानंतर मेक्सिकोमधील वेतन दर घटलेले आहे.

सॅम्युअलसन-स्टोपलर सिद्धांतानुसार एखाद्या देशात पुरेसे अकुशल श्रमिक असतील तर व्यापार उदारीकरणाचा परिणाम घडून असमानतेमध्ये कपात घडून येईल. मात्र लक्षात घेतले पाहिजे की, बाजार अपूर्ण आहे. सोबतच जोखमी आणि गतिशील परिणाम आहे. यामुळे व्यापार उदारीकरणामध्ये जोखमी वाढतात. ह्याचा सर्वात प्रथम हल्ला हा गरिबांवरच होतो. जागतिकीकरण आणि तंत्रज्ञानाचे हस्तांतरण यामुळे अकुशल श्रमिकाची बचत होत असली तरी त्याचे वेतन दर घटलेले आहे. सबळ असा संबंध खुला व्यापार, वेतन असमानता आणि उत्पन्नाबाबत आहे. उदारीकरणाचे धक्के विविध प्रकारचा परिणाम घडवून आणतात. विशेषत: परिणाम विविध उत्पन्न गटावर घडून येतो. वित्तीय उदारीकरणाचे धक्के दुर्बळावर अपायकारक परिणाम घडवून आणतात.

लिव्हानशॉन, बेरी आणि फ्रिडमन याच्या अध्ययनानुसार इंडोनेशियावर १९९७-९८ च्या आर्थिक अरिष्टाचा प्रतिकूल परिणाम घडून आला. विशेषत: हा परिणाम गरीब व न्यून उत्पन्न कुटुंबावर अधिक घडून आला. ह्यांच्या इजा त्यांना पोहचल्या.त्यांच्या कल्याणामध्ये घट झाली. बाजार उदारीकरणाने दारिद्र्याला प्रभावित केले. बाजार उदारीकरणाने व्हिएतनामच्या दारिद्र्य पातळीला प्रभावित केले. व्हिएतनाममध्ये व्यापार उदारीकरणामुळे वस्तूच्या किंमती वाढल्या. विशेषत: श्रमप्रधान उत्पादनामध्ये वाढ झाली. यामुळे कृषी श्रमिकांचे वेतन दर वाढले. परिणामत: व्हिएतनामच्या ग्रामीण भागातील उत्पन्न वाढून दारिद्र्यामध्ये कपात घडून येण्याचा सकारात्मक परिणाम घडून आला. उदारीकरणाचा परिणाम भिन्न देशांमध्ये भिन्न राहिलेला आहे.

दारिद्र्यामध्ये कपात घडून येणे म्हणजे बेरोजगाराच्या दरामध्ये कपात घडून येणे होय. तसाच हा परिणाम वस्तूच्या किंमती व उत्पादन घटकाच्या किंमतीवर घडून येतो. दारिद्र्यामध्ये कपात घडून आली तर कुटुंबाच्या कल्याणामध्ये वाढ घडून गेले. व्यापार उदारीकरणाच्या काळात दारिद्र्यामध्ये फारशी घट झाली नाही. किंमत बदलाचा

परिणाम दारिद्र्यावर घडून येतो. कृषी वस्तूंच्या किमती वाढल्या तर तीव्रतेने दारिद्र्य घटते. व्यापार उदारीकरणानंतर विकसनशील देशामध्ये ३-५ प्रतिशतने दारिद्र्य वाढले आहे. इंडोनेशियामध्ये वाहतूक आणि कृषीत्तर व्यवसायावर परिणाम घडून या दोन उत्पन्न गटामधील दारिद्र्य १४ प्रतिशतने वाढले तर सरासरीने एकूण दारिद्र्य घटले आहे. हरटेल, इव्ह निक आणि प्रिकेल यांच्या अध्ययनानुसार व्यापार उदारीकरणामुळे थायलंड, पेरू आणि व्हेनेझुएला मधील दारिद्र्य वाढले आहे. तर झांबियावर व्यापार उदारीकरणाचा कोणताच परिणाम घडून आला नाही. ब्राझिलमध्ये कृषीऐत्तर व्यवसाय व श्रमप्रधान उत्पादन गटामधील दारिद्र्य ५ प्रतिशत असून ते वाढले आहे. मात्र कृषी क्षेत्रातील दारिद्र्य घटले आहे. पण कृषी क्षेत्रातील दारिद्र्याचे प्रमाण २५ प्रतिशत आहे.

बचतीमधील उणिवा, कर्ज व विम्याची अनुपलब्धता, सामाजिक सुरक्षितता कार्यक्रमाची उणीव इत्यादीमुळे नकारात्मक धक्के बसून रोजगार नष्ट होतो. परिणामत: बेरोजगारी वाढून पर्यायी रोजगार शोधावे लागतात. व्यापार सुधारणांना अर्थव्यवस्थेशी जुळवून घेता आले नाही म्हणून रोजगाराचे प्रभावी कार्यक्रम राबविता आले नाही. नवीन बाजार निमिर्तीसाठी गुंतवणूक वाढविता आली नाही.

## विभाग 'क'

**अनुभव अमेरिकेचा :**

काही तरी बदल हवा आहे. काही चुकीचे घडते आहे. यातून क्रांतिकारक बदल २०११ या वर्षात घडून आला. हा एक ऐतिहासिक क्षण होता. उत्तर आफ्रिका आणि ट्युनेशियामध्ये खुला व्यापार व त्यातून वाढणारी बेरोजगारी याच्या विरुद्ध निषेधाची ठिणगी निर्माण झाली. अशा लहान-लहान निषेधातून सामाजिक-आर्थिक बदल अपेक्षित असतात. व्यापार उदारीकरणाचा हा निषेध इजिप्त, लिबीया, स्पेन, ग्रीस, इंग्लंड आणि अमेरिकेपर्यत पोहोचला होता. राजकीय आणि आर्थिक पातळीवर अपयश आल्यामुळे असमता (unfair) निर्माण झाली होती. जगातील शासने आर्थिक समस्यांना दुर्लक्षित करीत होती. ज्यामध्ये सगळ्यात चिवट बेरोजगारीचा वादप्रश्न झाला होता. लोभ प्रवृत्ती वाढून न्याय आणि वैश्विक मूल्याचा ऱ्हास घडून येत होता. निषेधकर्त्यांचे मत होते की, लोकशाही प्रक्रियेकडून बदलांना संबोधण्याची संधी नाही. निवडणूकाचे राजकारण पाश्चात्त्य लोकशाही देशामध्ये अपयशी ठरले आहे. अमेरिकन राष्ट्रपती बराक ओबामा यांनी आश्वासन दिले होते की, बदल होऊ शकतो विश्वास ठेवा. मात्र पर्याप्त आर्थिक धोरणे प्रस्तुत केल्या गेली नाही. परिणामत: तरुणांचा रोष वाढत राहिला.

अमेरिकेतील तरुणांच्या निषेधाने उदारीकरण धोरणामधील उणिवा स्पष्ट केल्या होत्या. ह्या निषेधाला तरुणांच्या पालकांचे सहाय्य होते. ते व्यवस्थेला तोडण्याचा प्रयत्न करीत नव्हते तर व्यवस्थेमध्ये बदल त्यांना अपेक्षित होते. २००८ च्या वित्तीय अरिष्टानंतर बेरोजगारीचा दर ४० प्रतिशत होता. याचा परिणाम वित्तीय क्षेत्रामध्ये गुन्हे घडून आले होते. अनेकांचा रोजगार गेल्यामुळे असमता निर्माण झाली होती. त्या विरुद्धचे पडसाद म्हणजे अमेरिकेतील ऑक्युपॉय वॉलस्ट्रीट येथील तरुणाचे आंदोलन होय. या आंदोलनाने अमेरिकेतील असमानतेवर प्रकाश टाकला. "आम्ही ९९ प्रतिशत आहोत" एक प्रतिशत विरुद्ध नव्व्यानऊ प्रतिशताचे हे आंदोलन होते. अमेरिकेमध्ये पोकळ समता (vanity fair) होती. या आंदोलनाने अमेरिकेतील प्रचंड वाढलेल्या असमानतेची जाणीव निर्माण करून दिली. या वाढत्या बेरोजगारी व त्यातून निर्माण झालेल्या असमानतेला तीन प्रमुख घटक जबाबदार होते. बाजार कार्यक्षम नाही, बाजार अस्थिर आहे आणि राजकीय व्यवस्था योग्य नाही म्हणून बाजार अपयशी ठरला आहे. परिणामतः आर्थिक आणि राजकीय व्यवस्था समता निर्माण करू शकली नाही.

**बाजाराचे अपयश :**

बाजार कार्यक्षम नाही. त्याला धक्के देण्याची आवश्यकता आहे. जागतिक वित्तीय अरिष्टानंतर बाजार आधिक्याने अस्थिर झालेला आहे. बँकर्सला वित्तीय अरिष्टाचे तडाखे बसलेले आहे. शिवाय सरकारचे पर्याप्त सहकार्य नाही म्हणून अर्थव्यवस्थेची घसरण घडून येत आहे. मात्र जगामध्ये अर्थहीन (unmean) गरजा वाढलेल्या आहे. गुंतवणूक वाढली तर दारिद्यातील लोकांना दारिद्याबाहेर काढता येऊ शकते. न्यून विकसित देशांच्या विकासाला प्रोत्साहन देण्याची आवश्यकता आहे. जागतिक अर्थव्यवस्था ही जागतिक तापमान वाढीचा सामना करीत आहे. संसाधनाचा अतिरिक्त वापर झालेला आहे. बाजाराच्या असमर्थतेतून बेरोजगारी वाढलेली आहे. म्हणून रोजगार निर्माण करण्याची आवश्यकता आहे. शिवाय बाजारामध्ये कार्यक्षमता व समता निर्माण करण्याची आवश्यकता आहे.

अमेरिकेमधील आर्थिक व्यवस्था अपयशी ठरली. असमानता वाढून तिचा विस्तार झाला. आर्थिक व्यवस्था न्यून स्थिर, न्यून कार्यक्षम, न्यून वृद्धी आणि लोकशाही संकटात असून ती आधिक्याने धोक्यामध्ये होती. बाजारामुळे लोकशाही व्यवस्थेच्या विश्वासाची झीज घडून आली. याचा परिणाम घडून देशाच्या दीर्घकालीन संधी अस्त पावल्या. ऑक्युपॉय वालस्ट्रिटचा संबंध जागतिकीकरणाच्या विरोधाशी आहे. जागतिकीकरण चांगले की वाईट यापेक्षा शासनाने दुर्बळपणे जागतिकीकरणाचे व्यवस्थापन

केले आहे. म्हणून यामध्ये बदल होण्याची आवश्यकता आहे. देश, अर्थव्यवस्था आणि जनता ह्यांच्या आंतर संबंधातून विकास घडून येत असतो. मात्र बाजार अर्थव्यवस्थेमध्ये संपदेच्या हव्यासातून विपन्नावस्था निर्माण झालेली आहे. बाजारशक्ती प्रचंड वेगाने वाढत आहे. मात्र त्यामध्ये नैतिक मूल्य नाही त्यामुळे बाजाराचे व्यवस्थापन कसे करायचे हा मूळ प्रश्न राहतो. यामध्ये महत्त्वाची भूमिका शासनच वठवू शकतो. प्रत्यक्षात मुक्त बाजाराचे समर्थन जरी केल्या गेले असले तरी तो संपत्ती निर्मिती आणि समान वितरण, पर्यावरण संवर्धन, श्रमिक आणि रोजगार इत्यादीच्या बाबतीत दुर्बळ ठरला आहे. बाजाराला ही उद्दिष्ट साध्य करायची असेल तर नियोजन करण्याची आवश्यकता आहे. नागरिकांना त्याच्या कामाचे लाभ प्राप्त होणे, स्पर्धात्मक नियमाची अंमलबजावणी होणे, नवीन करार घडून सामाजिक सुरक्षितता, रोजगार आणि किमान वेतन दर लागू होणे. आक्युपॉय वॉलस्ट्रिटच्या निषेधकर्त्यांच्या या मागण्या होत्या. यावरून बाजार दुर्बळ आणि संतापकारी आहे. जागतिक बाजार व्यवस्थेचा निर्वाह होऊ शकला नाही. यामुळे लोकाची स्थिती अत्यंत दयनीय झाली आहे.

**असमता आणि असमानता :**

वॉलस्ट्रिट ऑक्युपॉयच्या आंदोलनाने स्पष्ट केले की, उच्च पातळीची असमानता बाजाराने घडवून आणली आहे. बाजाराचा हा असमता (unfair) पैलू आहे. या असमता पैलू मुळेच नागरिकांना रोजगार मिळाले नाही. जे रोजगार होते ते अत्यंत कठीण स्थितीतील होते. तर काहीचे रोजगार गेले होते त्यामुळे प्रचंड बेरोजगारी वाढली होती. अमेरिका आणि युरोपमध्ये समता पैलू रूजवण्यामध्ये उथळपणा दिसून येतो. जे चांगल्या महाविद्यालयामधून पदवीधारक झाले. चांगले ग्रेड मिळाले त्यांनाच रोजगाराच्या चांगल्या संधी उपलब्ध होत्या. म्हणजे उच्च श्रीमंत वर्गालाच रोजगाराच्या संधी होत्या. मात्र सामान्याच्या संधी नाकारल्या होत्या. म्हणूनच २/३ अमेरिकन नागरिकांचे या आंदोलनाला समर्थन होते.

बाजार व्यवस्था ही अकार्यक्षम आणि अस्थिरतेपेक्षाही तिच्यामध्ये असमता भिनलेली आहे. वित्तीय अरिष्टानंतर अमेरिकेमध्ये बँकांना शासनानी अरिष्ट मुक्ती ऋण (Baile out) दिले. शिवाय बेरोजगार विम्याचा विस्तार केला. मात्र महिनोमहिने शोध घेतल्यानंतर देखील लोकांना रोजगार प्राप्त होत नव्हता. शासन रोजगार प्राप्त करून देण्यामध्ये अपयशी ठरले होते. वित्तीय अरिष्टामध्ये दशलक्ष लोकांचे आर्थिक नुकसान झाले. त्यांना कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत मिळाली नाही. समतेचा एक पैलू अमेरिकन मूल्यामध्ये भिनलेला आहे. तो म्हणजे समान संधी होय. समान संधी प्राप्त

करून देणारी भूमी म्हणून अमेरिकेची ओळख आहे. असे असून देखील नागरिकांना रोजगाराच्या संधी बाजाराने नाकारल्या होत्या. ह्यातून दुखावलेल्या तरूणानी हा निषेध केला होता.

ब्रीद वाक्य होते ''आम्ही ९९ प्रतिशत आहोत.'' या ब्रीदवाक्यातून अमेरिकेतील असमानता उफाळून आली. अमेरिका वर्गीय विश्लेषणापासून नेहमीच दूर राहतो. मात्र या आंदोलनातून उच्च आणि निम्न वर्ग अशी सरळ विभागणी दिसून आली. ही विभागणी वाढत गेलेली आहे. ह्यातूनच आम्ही ९९ प्रतिशत आहोत हे ब्रीद वाक्य निर्माण झाले. अर्थव्यवस्था आणि समाज व्यवस्थेच्या पातळीवर ही विभागणी झाली होती. वरच्या १ प्रतिशत वर्गाला रोजगार, संपन्नता, ज्यादा पगार होता मात्र बहुसंख्य लोकांना किमान वेतन व रोजगार देखील उपलब्ध नव्हता. अमेरिकन आर्थिक वृद्धीचे लाभ सामान्याना प्राप्त झाले नाही.

**समता मूल्य :**

बाजार व्यवस्थेमध्ये समता मूल्य दुर्लक्षित झालेले आहे. बाजार व्यवस्थेला संतुलित करण्याकरिता समता मूल्याचा पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. जोपर्यंत पैसे निर्माण करायला अंत नाही तोपर्यंत समतेलाही अर्थ प्राप्त होत नाही. अमेरिकेमधील सबप्राईम अरिष्टामध्ये कमी शिक्षित आणि गरिबांचे शोषण घडून आले. नीतिमूल्य हिरावल्या गेली. लोकांना चांगल्या शिक्षणातून चांगला रोजगार पाहिजे होता.नवीन उद्योगाची निर्मिती आवश्यक होती. गरीबांना दारिद्र्यातून बाहेर पडायचे होते. त्यांना त्याची स्वप्न साध्य करायची होती. मात्र बाजार व्यवस्थेमध्ये त्यांना ते साध्य करता आले नाही. हा बाजाराचा अविवेकीपणा आहे. ह्यातून हजारो लोकांच्या रोजगाराला धक्के बसले. जो बाजारामध्ये समता मूल्य राबविण्याच्या या उणिवा आहेत. बाजार वचनपुर्तता करीत नाही. त्यामुळे लोकांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावला नाही, पर्यावरण ऱ्हास घडून आला, गरिबांचे शोषण घडून आले.परिणामत: तरुण निषेधकर्ते निर्माण झाले. असमानता व बेरोजगारी तर निर्माण झाली पण त्याहीपेक्षा मूल्याचा ऱ्हास घडून आला. जो सर्वत्र स्वीकार्य आणि अमापनीय आहे.

**अमेरिकन व्यापार युद्ध :**

गेल्या काही महिन्यापासून अमेरिकन राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प संरक्षणात्मक मापके लावण्याबाबत गंभीर आहे. याबाबतचे पहिले पाऊल मार्च २०१८ मध्ये उचलले आहे. सर्व देशांकडून होणाऱ्या स्टील व ॲल्युमिनियम आयातीवर आधिक्याने प्रशुल्क लावण्यावर भर दिलेला आहे. सारांश स्वरूपात ही असमता कृती आहे. जी एका

मोठ्या अर्थव्यवस्थेने केलेली संरक्षणात्मक कृती आहे. याचा अर्थ अमेरिकेने दृश्य व्यापार युद्ध छेडले आहे. विशेषत: चीन सोबत हे व्यापार युद्ध पुकारलेले आहे. 'जशास तसे' ही व्यूहनीती वापरून गेल्या दोन महिन्यापासून द्विपक्षीय व्यापारामध्ये प्रशुल्क १०० अब्ज डॉलरवर जाऊन पोहोचले आहे. ह्यामुळे समता व्यापाराला (fair trade) धक्के बसत आहे. हा प्रचंड वणवा निर्माण झाला आहे.

अमेरिकन अर्थव्यवस्थेमध्ये २००८ पर्यत शाश्वत आर्थिक वृद्धी घडून येत होती. मात्र २००८ च्या अरिष्टाने प्रचंड तडाखा अमेरिकन अर्थव्यवस्थेला दिला. त्यामुळे व्यापार संबंधामधील तीव्रता कमी झाली. आता बहुपक्षीय व्यापारामधून बाहेर पडण्याची अमेरिकेची भूमिका दिसून येते. ह्यातूनच अमेरिका आणि चीन व्यापार युद्ध घडून आलेले आहे. ह्या व्यापार युद्धाचा जागतिक अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम घडून येत आहे. बहुपक्षीय व्यापार जागतिक व्यापार संघटनेच्या नियमांतर्गत घडून येतो. पण नियमाची पायमल्ली घडवून संरक्षणात्मक धोरणाचा पुढाकार अमेरिकेने घेतला आहे. अमेरिकेमध्ये संरचनात्मक समस्या निर्माण झालेल्या आहे. त्याचे कारण व्यापार असंतुलन आहे. वाढत्या आयातीमुळे अमेरिकेमध्ये अडथळे निर्माण झालेले आहे. निर्यातीपेक्षा वाढत्या आयातीमुळे अमेरिकन निर्माणी उद्योगाचा ऱ्हास घडून आला. उद्योगाच्या ऱ्हासामुळे रोजगार नष्ट झाले. परिणामत: अमेरिकन व्यापार प्रशासनाने व्यापार सहभागी देशांना लक्ष्य करून प्रशुल्के लावलेली आहे.

**व्यापार संरक्षणाची कृती :**

चीन जागतिक व्यापार संघटनेचा सभासद देश २००० पासून झाल्यापासून अमेरिकेने चीनवर दोषारोपण सुरू केले आहे. कायम सामान्य व्यापार शिल्लकीतून (permanent normal trade retatopm PNTR) चीन लाभ घेत आहे असे दोषारोपण केले जात होते. चीनचा बाजार प्रवेश वाढून अमेरिकन बाजारामध्ये वर्चस्व निर्माण झाले आहे. १९८५ मध्ये अमेरिका-चीनची व्यापार तूट सीमांत पातळीवर होती. १९९० च्या दशकामध्ये व्यापार तूट १० अब्ज डॉलर पर्यत वाढली. २००० मध्ये व्यापार तूट वाढून १०० अब्ज डॉलर झाली. २०१० मध्ये व्यापार तूट २०० अब्ज डॉलरवर पोहोचली. २०१२ व्यापार तूट ३१५ अब्ज झाली तर २०१७ मध्ये व्यापार तूट ३७६ अब्ज डॉलर वर पोहोचली होती. चीन जागतिक व्यापार संघटनेचा सदस्य झाल्यानंतर (२०००-२०१७) चीनच्या निर्याती १२५ अब्ज डॉलर वरून ५०५ अब्ज डॉलरपर्यत वाढल्या तर चीनच्या अमेरिकेसोबतच्या आयाती १९ अब्ज डॉलर वरून १३० अब्ज डॉलर पर्यत वाढल्या आहे.

अमेरिकेच्या डोंगराएवढ्या व्यापार तुटीला चीन जबाबदार आहे का ? अमेरिका –चीन ह्याची व्यापार तूट एकूण तुटीच्या अर्ध्यापेक्षा कमी म्हणजे ३७५ अब्ज डॉलर व्यापार तूट आहे. अमेरिकेची एकूण व्यापार तूट ७७५ अब्ज डॉलर आहे. मात्र चीनच्या सर्व आयातीबाबत अडथळे (block) निर्माण केले आहे. ह्यातून व्यापार संतुलन साध्य करण्याचा प्रयत्न केला जात आहे. ट्रम्प प्रशासनाने संरक्षणाची भूमिका घेतलेली आहे. आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग निवडून व्यापार युद्ध सुरू केले आहे. ज्यामध्ये प्रमुख लक्ष्य स्टील आणि अल्युमिनियम आयातीना केलेले आहे. अमेरिकेमध्ये अनेक व्यापार सदस्य देशांकडून स्टील व अल्युमिनियमची आयात केल्या जाते. यामध्ये युरोपियन समुदाय, दक्षिण कोरीया, भारत आणि आधिक्याने चीन आहे. या सर्व देशांच्या स्टील व ॲल्युमिनियम आयातीवर उच्चतम प्रशुल्क आकारलेले आहे. जागतिकीकरणाचा प्रसार आणि प्रचार करणारा अमेरिका या प्रक्रियेमधून मागे येतो आहे का ?

आज अमेरिका अशाश्वत व्यापार तुटीचा सामना करीत आहे. याशिवाय अमेरिकेच्या राष्ट्रीय उत्पन्नाबाबत विचार केला तर एकूण बचत आणि एकूण गुंतवणूकीमध्ये तफावत आहे. अमेरिकन अर्थव्यवस्था उपभोगवादी असल्यामुळे बचतीचा दर न्यूनतम राहिला आहे. १९५० नंतर केव्हाही बचतीचा दर २४ प्रतिशत राहिला नाही. सध्या अमेरिकेचा बचतीचा दर केवळ १७ प्रतिशत आहे. अमेरिका जागतिक भांडवली बाजारातून कर्ज घेणारा यशस्वी देश आहे अशी त्याची ओळख आहे. ह्यातून भांडवली बाजारावर ताण निर्माण झालेला आहे. मात्र भांडवल बाजार मोठ्या अर्थव्यवस्थांना वित्त पुरवठा करण्यास अपुरा असतो. यामधूनच अर्थव्यवस्थाची घसरण घडून येते. या आर्थिक समस्या अमेरिकेने स्वत: निर्माण केलेल्या आहेत. अंतर्गत अर्थव्यवस्थेकडे दुर्लक्ष केलेले आहे. अमेरिकन अर्थव्यवस्था गंभीर संरचनात्मक दुर्बलतेचा सामना करीत आहे. मात्र व्यापार प्रशासन दोषारोपण सहभागी देशांवर करीत आहे. ह्यातूनच व्यापार युद्ध घडून आलेले आहे. अमेरिकेतील वाढत्या आयातीमुळे रोजगार संपुष्टात आला आहे. रोजगार अमेरिकन नागरिकांना परत मिळवून द्यायचा आहे. आयातीतून पिळवणूक होऊन रोजगार गेल्याकडे अमेरिका लक्ष वेधत आहे.

**समारोप :**

उपरोक्त विश्लेषणावरून स्पष्ट होते की व्यापार उदारीकरणाचा प्रभाव भिन्न देशांमध्ये भिन्न राहिलेला आहे. असे असले तरी एकूणच विकसित आणि विकसनशील देशांमध्ये व्यापार उदारीकरणच नकारात्मक प्रभाव स्पष्टपणे दिसून येत आहे. जागतिक व्यापार संघटनेच्या चौकटीच्या अंतर्गत उदारीकरणाचे व्यवस्थापन विकसित आणि

विकसनशील देशांना करायचे होते. मात्र या व्यवस्थापनाशी विकसित आणि विकसनशील देशांना जुळवून घेता आले नाही. परिणामत: अमेरिका आणि ग्रीसमध्ये आर्थिक अरिष्ट घडून आले. इंग्लंड हा युरोपियन समुदायातून बाहेर पडून ब्रेग्झिट घडून आले. वाढती बेरोजगारी व विषमता यामुळे अमेरिकेतील ऑक्युपॉय वॉलस्ट्रिटचे आंदोलन घडून आले. या सर्व उदारीकरण विरोधी भूमिका आहे. बेरोजगारी, विषमता व आर्थिक अनिश्चितता यातून बाहेर पडण्यासाठी जागतिकीकरण विरोधी (anti-globalisation) धोरणाचा अंगीकार केला जात आहे. ट्रम्पिझममधून अमेरिकेने व्यापार युद्ध व संरक्षणात्मक धोरणाचा अवलंब केला आहे. ही राष्ट्रवादाकडे घेऊन जाणारी प्रवृत्ती आहे.

संदर्भ सूची :


1) Stiglitz E. Joseph and Charlton Andrew (2005) : Fair Trade for all, Oxford University Press, New York.
2) Stiglitz E. Joseph(2012) : The price of Inequality, Penguin Book, London.
3) Nayyar Deepak (20020 : Governing Globalization, Oxford University Press, New Delhi.
4) Bhagwati Jagdish(2004) : In Defence of Globalization, Oxford University Press, New Delhi.
5) Bhagwati Jagdish(2002) : Free Trade Today, Oxford University Press, New Delhi.
6) Stiglitz Joseph(2002) : Globalization and It's Discontent, Penguin Book, London.
7) Dhar Biswajit(2018) : Trade War of United State, Economic & Political Weekly, Vol. LIII, No. 37, Sept. 15.
८) हरमकर प्रशांत (२०१७) : ब्रेग्झिट : जागतिकीकरणाकडून राष्ट्रीयकरणाकडे, अर्थमीमांसा, जानेवारी-जून, खंड-१०, अंक-१.


* * * * *